# आर्य चाणक्य



BVBK-0402943

# आर्य चाणक्य



BVBK-0402943

लेखक
अरविंद पाटोळे

सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे २.

# अनुक्रमणिका


१. शिष्योत्तमामुळेच......................३
२. त्या वेळची परिस्थिती...................४
३. विष्णुगुप्त-कौटिल्य-चाणक्य..........५
४. तक्षशिलेकडे शिकण्यासाठी...........८
५. गुरुचरणी प्रतिज्ञा....................१०
६. विद्येत प्रगती........................१२
७. आचार्य पदाचा स्वीकार.............१३
८. धनानंदाच्या अन्यायाची शिष्यांकडून माहिती.............. १४
९. पाटलीपुत्राकडे प्रयाण................१४
१०. धनानंदाच्या दरबारात प्रथम.......१६
११. विष्णुगुप्ताचे आर्य चाणक्य झाले!.........................१७
१२. पाटलीपुत्रात दरारा!..............१९
१३. धनानंदाकडून अपमान............२१
१४. चंद्रगुप्ताचा शोध.................२२
१५. चंद्रगुप्तासारखे करू नको.........२४
१६. ॲलेक्झांडरच्या सैन्यात चंद्रगुप्त..........................२४
१७. एकच ध्येय.........................२५
१८. आणि शेंडीची गाठ बांधली!......२६
१९. चंद्रगुप्ताच्या रस्त्यातील काटे उपटून टाकले!...................२८
२०. कौटिल्याचे अर्थशास्त्र.............३०
२१. चाणक्यांचा निःस्वार्थीपणा........३१
२२. उपसंहार.........................३२



● प्रकाशक – मुद्रक ●

**प्रकाश य. कुंदूर**

**मे. श्रीराम ऑफसेट**

**क्वालिटी प्रिंटर्स आणि पब्लिशर्स**

सर्व्हे नं. १४/२३ 'गायत्री',
मु. पो. धायरी, पुणे ४१.

: प्रमुख विक्रेते :

**मे. सरस्वती ग्रंथ भांडार**

अप्पा बळवंत चौक,
पुणे २.

**मे. सरस्वती बुक डेपो**

नवी पेठ, सोलापूर ७.



लेखक :

**श्री. अरविंद पाटोळे**

स-नं. २३/८ हिल पॉइंट
सह. गृहरचना संस्था
प्लॉट नं. ११, श्रीधरनगर
धनकवडी,
पुणे ४३.



आवृत्ती : १९९४



© सर्व हक्क प्रकाशकांकडे




**किंमत १० रुपये**

# १ शिष्योत्तमामुळेच

शिष्योत्तमाने गाजविलेल्या पराक्रमामुळे गुरूचे नाव अमर व्हावे, सर्वांच्या लक्षात चिरंतन रहावे असे घडण्याचे अनेक दाखले भारतीय संस्कृतीत दिसून येतात. राजा हरिश्चंद्रामुळे वशिष्ठ, प्रभु रामचंद्रांमुळे वाल्मीकी, अर्जुनामुळे द्रोणाचार्य, छत्रपती शिवाजीमुळे दादोजी कोंडदेव, रामदास, एकनाथांमुळे जनार्दन स्वामी असे कितीतरी दाखले देता येतील.

अशा तऱ्हेचे अद्वितीय शिष्य घडविणारे आचार्य-गुरूसुद्धा तितक्याच श्रेष्ठ दर्जाचे असतात. अशा मालिकेमध्येच बरोबर शोभून दिसेल अशी चंद्रगुप्त मौर्य आणि आर्य चाणक्य ही शिष्य आणि गुरू यांची जोडी होऊन गेली.

इ. स. पूर्व सुमारे २५० वर्षे आधी चंद्रगुप्त मौर्य याने भारतात अत्यंत



आपले गुरू चाणक्यांच्या राजनीतीच्या पाठाप्रमाणे चंद्रगुप्ताने राज्यकारभार केला.

शक्तिशाली आणि अत्यंत विस्तृत अशा बलाढ्य साम्राज्याची निर्मिती केली. त्या काळात चंद्रगुप्ताच्या आधिपत्याखाली अफगाणिस्थान, हिंदू पर्वताचा काही भाग, उत्तर प्रदेश, बिहार आणि दक्षिण भारतातील बराच भाग आलेला होता. या सर्वच प्रदेशांवर चंद्रगुप्ताच्या एकछत्री अंमलाचे प्रबळ प्रशासन होते.

चंद्रगुप्ताने जसा आपल्या साम्राज्याचा विस्तार केला, त्याचप्रमाणे तो उत्तर प्रशासक म्हणूनही प्रसिद्धीस आला. त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्याने आपले गुरू विष्णुगुप्त उर्फ आर्य चाणक्य उर्फ कौटिल्य यांनी त्याला शिकविलेल्या राजनीतीच्या, त्यांनी घालून दिलेल्या दंडनीतीच्या आधारे राज्य-कारभार केला.

चंद्रगुप्ताचे प्रशासन जनकल्याण करणारे असेच होते. त्याने साम्राज्याचे अनेक भाग पाडून प्रशासनासाठी मोठ्या कौशल्याने कर्तव्यदक्ष, कार्यक्षम, विश्वासू व्यक्तींची नियुक्ती केली होती. आर्य चाणक्यांनी आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात सांगितलेल्या मताप्रमाणेच चंद्रगुप्त मौर्य याने आपली शासन–व्यवस्था केली होती.

गुरूंनी दिलेल्या पाठांचे तंतोतंत पालन करून ते शिरसावंद्य मानून राज्य केल्यामुळेच यश आणि कीर्ती त्याला प्राप्त झाली. चंद्रगुप्ताच्या या महान कृतीमागे, यशामागे खंबीरपणे पाठीशी उभी राहून सतत मार्गदर्शन करणारी शक्ती होती, आर्य चाणक्य या गुरूची. गुरूने आपल्या मनातील सर्व इच्छा आपल्या शिष्यांमार्फत पूर्ण करून घेतल्या होत्या.

☆ ☆ ☆

## २ त्या वेळची परिस्थिती

भारतीय संस्कृतीचा मेरुमणी ठरलेल्या महाभारत ग्रंथामधील गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात, "या भूमीमध्ये धर्माला ग्लानी आल्यासारखे जेव्हा वाटते, तो मृत होऊ लागल्यासारखे जेव्हा वाटते तेव्हा तेव्हा या धर्माचे रक्षण करण्यासाठी मी पुन्हा जन्म घेतो."

सुमारे २२०० ते २५०० वर्षांपूर्वीची भारतातील सामाजिक, राजकीय परिस्थिती सावरण्यासाठी आर्य चाणक्यांच्या रूपाने त्या संकटसंहारक श्रीकृष्णानेच जणू पुन्हा जन्म घेतला आहे, असे आपणास वाटते.

कारण नेमक्या याच सुमारास भारतातील लोकनियुक्त राजसत्ताक पद्धती

मागे पडला होता. बलिष्ठ व्यक्ती हाती सत्ता घेऊन राजा होत होती. यातूनच पुढे वंशावर आधारित राजपद्धतीची सुरुवात झाली होती. राजाचा मुलगा, मग तो कसा का असेना- लायक असो वा नसो - राजा व्हायचा. यातूनच तोंडपूजा करणाऱ्या स्वार्थी व्यक्तींची प्रभावळ राजाभोवती निर्माण व्हायची.

स्वामिनिष्ठा म्हणजेच राजनिष्ठा मानली जायची आणि त्यामुळे भ्रष्टाचार, अनाचार सुरू व्हायचे, न्यायसभेचेही पावित्र्य व मान राखला जात नसे, विद्वानांची अवहेलना व्हायची, सामान्य प्रजा भयभीत होऊन जायची आणि बिचारी 'ब्र' सुद्धा काढू शकत नसे. अशा वेळी परकीय हस्तक्षेपाची भीती निर्माण होते.

भारतातील नंद घराण्यातील शेवटचा राजा धनानंद याच्या राज्यात तर याची प्रचीती येत होती. धनानंद शूर होता, पराक्रमी होता; पण विलासी, ऐषआरामी, व्यसनी होता. रती आणि मदिरेच्या खूप आहारी गेला होता.

आणि नेमके याचवेळी परकीय राजांची पावलं आपल्या या पावन भूमीकडं वळू लागली होती. हिंदुकुश, काराकोरम पर्वतातील खैबरखिंड, बोलन घाटातून अनेक टोळ्या, त्यांचे राजे भारतावर चाल करून येत होते. जग जिंकण्यासाठी निघालेला ॲलेक्झांडरसुद्धा ग्रीसपासून विजय संपादन करीत करीत भारताच्या दरवाजातून आत प्रवेश करता झाला होता.

अशा वेळी चाणक्यासारख्या विद्वान व्यक्तीने आपल्या ज्ञानाच्या जोरावर दुसरी शक्ती उभी केली. अनुयायांची एकजूट घडविली. भ्रष्ट राजसत्तेवर आघात केला. पण हा आघात म्हणजे बंड नव्हते, तर एक पर्यायी शक्तीचा उदय होता. कारण हा आघातही नियमबद्ध असाच होता.

☆ ☆ ☆

## ३ विष्णुगुप्त - कौटिल्य - चाणक्य

चाणक्य !

भारताच्या सामाजिक, राजकीय इतिहासातच नव्हे तर जगाच्या अर्थशास्त्रातसुद्धा स्वयंभू - सूर्याच्या तेजानं तळपणारं, सर्वांना मोहून टाकणारं, आकर्षित करून घेणारं, विचारप्रवण करणारं हे नाव. पण त्याचं खरं नाव होतं विष्णुगुप्त.

विष्णुगुप्ताचे वडील मगध राज्यातील चणक या गावी रहायचे. ते त्यांचंच गाव होतं. या गावाच्या नावावरूनच पुढे पंडित विष्णुगुप्ताला, आचार्य विष्णुगुप्ताला लोक चाणक्य म्हणून ओळखू लागले.

कुटिल हे त्याचे गोत्र होते. चाणक्याने धनानंदाला संपविण्यासाठी वापरलेल्या कुटिल नीतीमुळे विष्णुगुप्ताला लोक कौटिल्य म्हणू लागले असे म्हणतात. पण त्याच्या कुटिल या गोत्रावरूनच लोक त्याला कौटिल्य म्हणू लागले, हे म्हणणे जास्त योग्य वाटते.

नंदकुळातील धनानंद राजाच्या काळात राज्यात भ्रष्टाचार माजला होता. दरबारी, मंत्री, अधिकारी अनाचारी झाले होते. पाटलीपुत्र या राजधानीत तर 'राजा आंधळा प्रजा आंधळी' अशी परिस्थिती निर्माण झाली होती. अशा वेळी आपला हेतू सिद्धीस नेण्याच्या दृष्टीने चाणक्याने आपल्या मजबूत अशा गुप्तहेर यंत्रणा उभारल्या आणि त्यांच्या साह्याने नंदाचे राज्य पार पोखरून टाकल. यासाठी त्याने अनेक कारस्थाने रचली व आपल्या विवेकाच्या साह्याने, मेधावी तर्क-संगतीच्या मदतीने ती कारस्थाने यशस्वी केली.

नाराज अधिकारी, नाराज प्रजाजन यांचा त्याने आपले साधन म्हणून चांगला उपयोग करून घेतला आणि मग शत्रूचा शत्रू तो आपला मित्र मानून त्याचे सहाय्य घेतले. पण कोणाचे किती सहाय्य घ्यायचे याचे तारतम्य ठेवून कोणालाच त्याने वरचढ होऊ दिले नाही व नंद साम्राज्याचा पाडाव केला.

चाणक्य सर्वज्ञ होता. त्याची बुद्धी सर्वगामी, सर्वव्यापी होती. वेद-वेदांची वेगवेगळी अंगे, धर्मशास्त्रे, नास्तिक व आस्तिक दर्शने, तर्कविद्या इत्यादींचा सखोल साधकबाधक अभ्यास केला होता. त्यांची समीक्षा केली होती. प्रवास करून लोकजीवन जवळून पाहिले होते.

मगध राज्यातलं चणक नावाचं गाव. तिथं कुटिल गोत्रातलं कपिल यांचं कुटुंब रहात होतं. कुटुंब म्हणजे इनमीन तीन माणसं. एक कपिल स्वतः, दुसरी व्यक्ती म्हणजे त्यांची बायको आणि तिसरा या दोघांना प्रौढपणी झालेला एकुलता एक मुलगा. त्यांनी त्याचं नाव ठेवलं होतं, विष्णुगुप्त.

"पुत्र व्हावा ऐसा गुंडा। त्याचा तिन्ही लोकी झेंडा" हे वचन विष्णुगुप्तानं खरं खरं करून दाखविलं होतं.

कारण विष्णुगुप्त हा अगदी लहानपणापासूनच अत्यंत हुशार होता. कुशाग्र बुद्धीबरोबरच त्याला गुटगुटीत व बळकट अशा तेजःपुंज शरीराचीही देणगी मिळालेली होती. भरपूर बुद्धी आणि भरपूर शक्ती यामुळेच की काय तो लहानपणी खूप म्हणजे खूपच खोडकर होता. दिवसभर रानोमाळ भटकायचा. त्याचे इतके उपद्व्याप चालत असत, की त्यामुळे त्याची आईच काय पण त्याचे वडील कपिलसुद्धा वैतागून जात असत. पण एकुलता एक मुलगा असल्याने त्याला दुखवणेही त्यांच्या जीवावर येत असे.

पण हा बाळ 'लाडाचा वेडा' होऊ नये, असं दोघांनाही वाटत होतं. त्याच्या आयुष्याला काही चांगलं वळण लागायचं असेल तर त्यानं पद्धतशीर वागलं पाहिजे, त्याच्या नित्याच्या जीवनात शिस्त उतरली पाहिजे, असं त्यांना वाटत होतं.

विष्णुगुप्त खोडकर असला, अवखळ असला तरीही त्याचं आपल्या आईवर खूपच



विष्णुगुप्ताचे भविष्य ऐकल्यापासून तो आपल्याला दुरावेल याची विष्णुगुप्ताच्या आईला भीती वाटू लागली.

प्रेम होतं. ते एकदा त्याने आपले पुढचे दात पाडूनच सिद्ध केलं होतं. त्याचं असं झालं होतं–

कपिल ज्योतीष जाणत. ते नेहमी त्यांच्या पत्नीला म्हणत असत, "आपल्या विष्णुगुप्ताचे योग फार विलक्षण आहेत. त्याच समोरच दोन दात पुढे आलेले आहेत हे तो राजा होण्याचं लक्षण आहे."

एक दिवस विष्णुगुप्त बाहेरून घरात आला. पण नेहमी तो बाहेर गेला म्हणजे दारात त्याची वाट पाहात थांबणारी आई त्या दिवशी दारात नव्हती. म्हणून तो आतमध्ये गेला. तो आश्चर्याने थबकलाच. त्याची आई चक्क रडत होती. खरं म्हणजे तिचा संसार तसा सुखी होता. पण मग आज असं रडत बसण्यासारखं एकाएकी काय घडलं असावं, हे त्याला कळेना. त्याच्या बालमनाचा गोंधळ उडाला. त्यानं आईच्या गळ्याला मिठी घालून तिला रडण्याचं कारण विचारलं. पण ती सांगेना.

पण विष्णुगुप्तही पडला हट्टी. त्यानं आईचा पिच्छाच सोडला नाही. त्याच्या जीवाची नुसती उलघाल चालली होती. आपल्या आईचं ते दुःख त्याला पाहवत नव्हतं. तो आईला म्हणाला, "आई, तुझ्या दुःखाचं कारण काय आहे ते मला कळू दे. पहा, मी ते दूर करतो की नाही ते."

शेवटी आई म्हणाली, "तुझ्या ओठावर हे जे दोन दात पुढं आलेले आहेत ना, त्यामुळे मी रडते आहे."

"म्हणजे? मी नाही समजलो." विष्णुगुप्त आईला म्हणाला. आई पुढं म्हणाली, "अरे, ते तुझ्या भरभराटीचे, प्रगतीचे चिन्ह आहे."

आईचं बोलणं ऐकून विष्णुगुप्त म्हणाला, "म्हणजे आई, माझ्या समृद्धीमध्ये तुला आनंद नाही का वाटत?"

आई म्हणाली, "तसं नाही रे बाळा! तुझा विकास, भरभराट हे तर माझं सर्वस्व आहे. ते पहायला मिळावं हे माझं स्वप्न आहे. म्हणजे मी स्वार्थी आहे म्हण हवं तर, संकुचितसुद्धा म्हण पाहिजे तर! पण या दातांमुळे तू मोठा होशील; प्रगतीची झेप घेऊन उन्नतीची गगनचुंबी शिखरं गाठशील. तू राजा होशील, सम्राट होशील, पण..... पण तू मला दुरावशील, आपली रोजची सारखी होणारी भेट दुरापस्त होईल. कदाचित लोककल्याणाच्या कामात, राज्यकारभारात तू इतका दंग होशील की, तुला माझा विसर पडेल अशी मला भीती वाटते. तुझा दुरावा मला सहन होऊ शकणार नाही. मग मी जगणार तरी कशी?"

आईचं बोलणं संपलं. तिच्या दुःखाचं कारण कळालं, तसा तो सरळ परत अंगणात गेला. एक दगड हातात घेऊन आला आणि आईला काय होतंय हे कळायच्या आत पुढं आलेल्या दोन दातांवर दगड मारून ते त्याने पाडूनही टाकले.

"अरे अरे, काय केलंस हे?" असं म्हणून आईनं त्याला आपल्या कुशीत घेतलं. आपल्यावरील प्रेम पाहून झालेल्या आनंदाने त्याचे पापे घेतले आणि डोळ्यांतील आनंदाश्रूंनी त्याला सचैल स्नान घातलं.

☆ ☆ ☆

## ४ तक्षशिलेकडे शिकण्यासाठी

कपिल आणि त्यांच्या पत्नीने शेवटी आपल्या अतिशय लाडक्या विष्णुगुप्ताला शिक्षणासाठी पाठवायचं नक्की केलं. त्या काळात शिकण्यासाठी गुरुगृहीच जावं लागत असे. गुरुकुलपद्धतीने गुरूच्या देखरेखीखाली, रोज त्यांची सेवा करूनच शिकावं लागायचं.

पण या काळापर्यंत वनातले आश्रम बंद झाले होते. अध्यापनाची काही ठिकाणं निश्चित झाली होती. त्यांना 'विद्यापीठ' असे म्हणत. कपिलदेवांना वाटत होतं की, विष्णुगुप्तानं आयुर्वेदाचं ज्ञान मिळवावं. बाकीची विद्या त्यानं शिकावीच असं नाही. म्हणजे ८-१० वर्षांत त्याला परत घरी आणता येईल. शिक्षणातलं कौशल्य लोकसेवेसाठी लावता येईल.

तक्षशिला विद्यापीठ त्या काळात आयुर्वेदाच्या शिक्षणासाठी खूप खूप प्रख्यात होतं. ते गांधार राज्यात होतं. गांधार राज्य



विद्यार्जनासाठी विष्णुगुप्ताला घेऊन वडील एका शुभमुहूर्ती निघाले.

म्हणजे सध्याचा पाकिस्तानात असलेला रावळपिंडी व पेशावर या दोन जिल्ह्यांचा प्रदेश होय. तक्षशिला ही या राज्याची राजधानी होती. हे शहर व्यापार-उदिमाचे प्रमुख ठिकाण होते. पण सर्व विद्यांचे प्रमुख केंद्रही होते. येथील शिक्षणपद्धतीमुळे दूरदूरपर्यंत त्याची कीर्ती पसरलेली होती व केवळ भारतातीलच दूरदूरच्या राज्यांतून नव्हे तर परदेशांतूनही येथे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी येत असत.

अशा तक्षशिलेत मगधापासून शेकडो कि. मी. दूर अंतरावर विष्णुगुप्ताला पाठविताना आईचं अंतःकरण जड झालं होतं. त्याचा खट्याळपणा तिला माहीत होता. म्हणून तिला चिंता वाटणारच म्हणा. तिनं विष्णुगुप्ताला बजावलं, "इथं अचपळपणा करतोस, खोडकरपणा करतोस तसा तिथं करू नकोस. चांगलं शिकून घे. खूप शिकून घे. मोठा हो."

वडील कपिलदेव म्हणाले, "अरे बाळा, तिथं तुला नक्कीच विद्येची आवड उत्पन्न होईल, आणि एकदा का विद्येची गोडी लागली, की तू संसारसुद्धा करणार नाहीस."

शेवटी शुभमुहूर्ताचा दिवस पाहून कपिलदेव विष्णुगुप्ताला घेऊन तक्षशिलेकडे निघाले. अर्थात त्या काळात रेल्वे, मोटार, विमाने इ. वाहने नव्हती म्हणून बैलगाडी, घोडा, किंवा काही वाहन नसलेच तर पायी असा प्रवास करत मजल-दरमजल करीत ते दोघे चार महिन्यांनी तक्षशिला नगरीत

पोहोचले. तेथे धर्मशाळेत मुक्काम करून कपिलदेवांनी आचार्यकुलाची माहिती घेतली व विष्णुगुप्ताला आचार्य ज्ञानराजांच्या कुळात दाखल केलं. त्यावेळी विष्णुगुप्ताचं वय होतं, फक्त नऊ वर्षांचं.

☆ ☆ ☆

## ५ गुरुचरणी प्रतिज्ञा

चणक गाव सोडताना आईच्या मनाची झाले घालमेल आणि तक्षशिलेत आचार्य ज्ञानराजांशी बोलताना जड झालेलं अंत:करण आणि भरून आलेला ऊर नऊ वर्षांच्या वयातही विष्णुगुप्ताला उमगला होता, त्यानं मनात निश्चय केला होता, 'आता आपण हूडपणा सोडायचा, मन लावून शिकायचं. आयुर्वेदात प्रवीण व्हायचं.



गुरुचरणांना स्पर्श करून त्याने विश्वामित्रानंतर प्रतिसृष्टी निर्माण करणारा दुसरा 'विष्णुगुप्तच' होण्याचे ठरविले

आई-वडिलांचं स्वप्न साकार करायचं. लवकरच आपल्या गावात जायचं. सहदेव आचार्यांच्या तारीशी लग्न करायचं. सुखानं संसार करायचा.'

हा निश्चय करताना येतानाचा प्रसंग त्याला आठवला आणि त्याचं त्यालाच मनात हसू आलं. येताना चिमुरड्या तारिणीनं त्याचा हात हातात घेऊन म्हटलं होतं, "लौकर परत येईल असं वचन दे." पण वचनात बांधून पडण्याचा याही वयात त्याचा स्वभावच नव्हता. त्याने झटकन् हात हिसडत म्हटले, "मी नाही देत वचन जा."

पण खूप शिकण्याचा निश्चय मात्र तो झटकून टाकू शकला नाही. निश्चय केला खरा. तरी पण दोन वर्षांपर्यंत त्याचं लक्ष शिकण्याकडे लागतच नव्हतं. अकरा वर्षांचा झाला, पण त्याला काही म्हणजे काहीच येत नव्हतं. त्याच्याबरोबर शिकणारे दुसरे विद्यार्थी, त्याचे मित्र त्याच्याकडे उपेक्षेनेच पहायचे.

आणि अचानक त्याला तक्षशिलेतील पहिला दिवस पुन्हा आठवला. पहिल्याच दिवशी ज्ञानराजांनी विश्वामित्राची गोष्ट सांगून विद्यमुळेच 'प्रतिसृष्टी' निर्माण करण्याची क्षमता येते, इतकी ती श्रेष्ठ आहे असा उपदेश केला होता. त्यावेळी तो आचार्य ज्ञानराजांच्या चरणांना स्पर्श करून म्हणाला होता,

"आचार्य, आपला आशीर्वाद मिळाला तर मीसुद्धा विश्वामित्र होऊ इच्छितो. मी इतका शिकून मोठा होऊ इच्छितो की विश्वामित्रानंतर पुन्हा दुसरी प्रतिसृष्टी निर्माण करणारा कोण असा जर प्रश्न विचारला तर त्याचं उत्तर विष्णुगुप्त असंच आलं पाहिजे."

ही आठवण येताच तो अस्वस्थ झाला. आपल्यावर जीव ओतणारी आई, भविष्याची चांगली जाण असलेले, पंडित असलेले विद्वान वडील यांची आठवण आली. मग वाया घालविलेल्या दोन वर्षांमुळे मन उद्विग्न झालं. आणि मग विष्णुगुप्त मनापासून शिकायला लागला. शिकता शिकता वर्षामागून वर्ष कशी भराभरा उडून गेली ते कळालेसुद्धा नाही.

☆ ☆ ☆

## ६ विद्येत प्रगती

केलेली प्रतिज्ञा पार पाडण्याचा कर्मठपणा याही वयात त्याच्यात दिसून येत होता. गुरूचरणाशी केलेल्या प्रतिज्ञेची आठवण होताच तो पुरता भारल्यासारखा झाला. त्यानं हूडपणा सोडला. एकाग्रतेनं अध्ययन करू लागला. एका दृष्टीनं त्यानं जणू तपाचरणच करायला सुरुवात केली.

त्याच्या मनात लपून असलेला, घर करून बसलेला अभिमान, अहंभाव आचार्य ज्ञानराजांनी बरोबर हेरला होता. त्याचाच फायदा घेऊन ते विष्णुगुप्ताला घडवू लागले होते. विष्णुगुप्ताचं मन आता शिकायला पूर्णपणे तयार झालं होतं. सात-आठ वर्षांत त्यानं आयुर्वेदात प्रावीण्य संपादन केलं. चारी वेदांत प्रगती केली. धनुर्विद्येत कौशल्य प्राप्त केलं.

पण तक्षशिलेत अनेक राजपुत्रसुद्धा शिकत होते. त्यांची धनुर्विद्येतली प्रगती पाहून ते त्याचा उपहास करायचे. टिंगल करायचे. ते विष्णुगुप्ताला म्हणायचे,"अरे तू ब्राह्मण. तुला कुठं राज्य करायचं किंवा राजाच्या पदरी नोकरी करायचीय. संध्या, वेदविद्या हीच तुझ्या उपयोगाची. तुला काय करायचीय् धनुर्विद्या?"

अशा वेळी त्याच्या डोळ्यांपुढे उभे रहात द्रोणाचार्य, भीष्माचार्य. मग तो या राजपुत्रांना म्हणायचा, "द्रोणाचार्य कुठं होते राजपुत्र? आणि तुम्हा राजपुत्रांना शिकविणारा, घडविणारा कोणी राजा नसतो. तो असतो ब्राह्मण. कदाचित तुमच्या पुढच्या पिढ्यांना मीच शिकवीन. मीच राज्य निर्माण करीन. राजा घडवीन. लोकशिक्षणाचं काम करीन. दुष्टांचा नायनाट करायलाही मी भिणार नाही."

राजपुत्रांच्या अशा डिवचण्यानं त्याचा अहंभाव आणखीनच पेटून उठायचा. तो विद्येत जास्तीत जास्त कौशल्य प्राप्त करायचा. आता त्यानं राज्यशास्त्रही आत्मसात केलं. अर्थशास्त्र कोळून प्याला. तो विद्याध्ययनात एवढा रममाण झाला की गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याचा विचारसुद्धा त्याच्या मनात यायला जणू घाबरत होता. आश्रमात आचार्यांनी ज्ञानदानासाठी निर्मिलेली पंचवटी हेच त्याचं आता कायमचं वास्तव्य स्थान बनलं. रात्रंदिवस तो तिथंच रमू लागला. जरासा कंटाळा आला की तिथंच बसून झाडांचं, निसर्गाचं निरीक्षण करायचा. पक्ष्यांचे निर्मळ, निष्पाप बोल ऐकायचा. मन प्रसन्न करून घ्यायचा.

एक दिवस आचार्य म्हणाले, "विष्णुगुप्ता, तू आता उपजीविकेचं आणि उपकारासाठीचं पूर्ण ज्ञान प्राप्त केलं आहेस. आता तुला चणकाला पुन्हा पाठवावं असं म्हणतो."

☆ ☆ ☆

## ७ आचार्यपदाचा स्वीकार

आचार्यांनी जेव्हा 'घरी पाठवावं म्हणतो' असं म्हटलं तेव्हा कुठे विष्णुगुप्ताला आपल्या आईवडिलांची आठवण झाली. पण तेवढ्यातच त्याला कळलं की, पाटलीपुत्राच्या आसपासच्या गावांत पुरानं थैमान मांडलं आहे. आई-वडिलांच्या भेटीसाठी उतावीळपणे धावणारं मन त्यानं मोठ्या प्रयासानं आवरलं. ते कठोर केलं आणि इथंच राहून पुढं आणखीनच शिकायचं ठरविलं. त्याप्रमाणे आणखी आठ वर्षे तिथंच राहून अध्ययन केलं. आता त्याचं वय पंचवीस वर्षे झालं होतं.

अध्ययनात विष्णुगुप्तानं सर्वस्व ओतलेलं आचार्यांनी पाहिलं होतं. त्याची शिकण्याची ओढ त्यांना माहीत होती. त्याची एकाग्रता आचार्यांनी पाहिली होती. त्याची ज़िद्द त्यांनी अनुभवली होती. त्याचा स्वाभिमान त्यांनी फुलवला होता. आचार्यांनी त्याला पुरतं जाणलं होतं.

आणि म्हणूनच दीक्षान्त दिवाच्या आधी आचार्यांनी विष्णुगुप्ताला सांगितलं, "मी हे आचार्यपद सोडत आहे. आता आश्रमाची सारी जबाबदारी तुझ्यावर सोपवीत आहे. मी इतर विद्यार्थ्यांना सांगणार आहे, तुमच्या शंका आता विष्णुगुप्तच सोडवील. तोच यापुढे तुम्हा सर्वांना मार्गदर्शन करील."

अशा तऱ्हेने जिथं शिकला त्याच आचार्यकुलाचं आचार्यपद विष्णुगुप्ताच्या खांद्यावर पडलं. पण ही जबाबदारी स्वीकारताना एक नवा आदर्श निर्माण करायचा, असं त्यानं पक्कं ठरवून टाकलं.

विष्णुगुप्त आता भल्या पहाटे उठायचा. आपलं सर्व आन्हिक लवकर उरकायचा. आपल्या शिष्यांना ज्ञान देण्यास सुरुवात करायचा, ते मध्यान्हीपर्यंत. मग दुपारचे भोजन घेऊन अनेकांशी विविध विषयांवर चर्चा करायचा. मग संध्याकाळीच आन्हिके आटोपायचा आणि रात्री झोपण्यापूर्वी विविध विषयांचं चिंतन करायचा.

त्याच्या चिंतनाचा विषय फक्त आपले विद्यार्थी किंवा त्या तक्षशिलेपुरताच मर्यादित नव्हता. तो संपूर्ण भारताच्या भविष्यकाळाचा विचार करीत होता. भारतातील लोकांच्या भवितव्यासंबंधीच्या विचाराने तो कासावीस व्हायचा. कारण त्यावेळचे राजे त्याने पाहिले होते. त्यांचा जुलूम, अन्याय पाहिला होता. त्यांचे आपसांतील वैर त्याला माहिती होते. ॲलेक्झांडर भारतावर चालून येत असल्याची त्याला माहिती मिळाली होती. इथल्या राजांच्या विलासी, ऐषआरामी, नाकर्तेपणाच्या जीवनाची त्याला माहिती होती.

☆ ☆ ☆

## ८ धनानंदाच्या अन्यायाची शिष्यांकडून माहिती

असेच एकदा आचार्य विष्णुगुप्त आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञान देत होते. त्यावेळी ते राजनीती समजावून देत होते. इतक्यात त्यांना दिसले की समोर बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी एक विद्यार्थी रडतो आहे. हुंदके देतो आहे.

आचार्य विष्णुगुप्त त्या विद्यार्थ्याजवळ गेले. त्याच्या रडण्याचे कारण विचारले तेव्हा तो म्हणाला, "आचार्य, मी मगधचा राहणारा. तिथं धनानंद राजा राज्य करीत आहे. त्याने अन्यायाचा, जुलमाचा अगदी कळसच गाठला आहे. माझ्या आई-वडिलांनी कर भरला आहे. तरी तो परत भरायला भाग पाडत आहे. आम्ही गरीब. कर परत भरता येणार नाही. मग धनानंदाने माझ्या आई-वडिलांना तुरुंगात टाकण्याची धमकी दिली आहे. माझे आई-बाबा आता तुरुंगात खितपत पडणार म्हणून मला दुःख होतं आहे."

जनतेच्या अशा दुःखाच्या माहितीने आचार्य विष्णुगुप्त मनात जास्त अस्वस्थ होऊ लागले. मगधचा राजा द्युत, मदिरा आणि मदिराक्षी यांतच धुंद असतो, हे ऐकून ते बेचैन झाले. भावी काळातील संकटाची लागलेली चाहूल मगध राजाला देऊन त्याला सावध करावे, असे त्यांना वाटले. यासाठी प्रसंगी आचार्यपदही सोडायचा विचार विष्णुगुप्ताच्या मनात आला.

विष्णुगुप्ताचं मन मग मगधाकडे ओढ घेऊ लागलं. पाटलीपुत्रास जाण्यामागे जसं धनानंदाला सावध करण्याचा विचार होता तसंच आणखी एक कारण होतं.

दीक्षान्त समारंभाच्या वेळी अंभी राजानं पाटलीपुत्राच्या विद्वत्त सभेकडून आचार्यपदाचं प्रमाणपत्र मिळविण्याचं आव्हान विष्णुगुप्तास दिलं होतं आणि ते त्यानं स्वीकारलंही होतं. कारण त्याच दिवशी त्यांनी जाहीर केलं होतं की, मी पाटलीपुत्राहून आचार्यपद प्राप्त करीपर्यंत आचार्य म्हणवून घेणार नाही. तोपर्यंत मी फक्त 'आर्य'च संबोधून घेईन.

म्हणूनच तीन वर्षं तक्षशिलेत अध्यापनाचे काम करून आर्य विष्णुगुप्त पाटलीपुत्राकडं जाण्यास सिद्ध झाले होते.

☆ ☆ ☆

## ९ पाटलीपुत्राकडे प्रयाण

अठरा वर्षं तक्षशिलेत काढून शिक्षण व तीन वर्षं अध्यापन करून विष्णुगुप्त पाटलीपुत्राकडे निघाला. निघताना तो एका व्यापाऱ्याबरोबरच निघाला. पूर्वी लांबचा प्रवास करायचा म्हणजे वाटाडे म्हणून, सोबत म्हणून अशा व्यापाऱ्यांचीच मदत घेतली जायची. विष्णुगुप्ताने त्यांच्याबरोबर प्रवास करताना त्यांच्या सोबतीचा फायदा ज्ञानार्जनासाठीच करून घेतला. अठरा वर्षात त्याला जे ज्ञान मिळविता आलं नाही ते त्यानं त्यांच्याबरोबरच्या प्रवासात त्यांच्याशी बोलून, निरीक्षण करून मिळविलं.

या व्यापाऱ्यांकडे हिरे, मोती, चंदन, रत्नमणी, वेगवेगळ्या प्रकारची कातडी,



व्यापाऱ्यांसोबत विष्णुगुप्त पाटलीपुत्रकडे निघाला.

वेगवेगळ्या प्रकारची चंदनी लाकडं, लोकर, कापूस, रेशीम, रेशमी कापड, सोनं, रुपं, शंख, धान्य, धातू, तेल, साखर, मद्य, फळं, पशुपक्ष्यांची हाडं, शिंग, शेपट्या, वेगवेगळी हत्यारं इ. प्रकारच्या वस्तू असत. या सर्वांवरून त्यानं आपल्या भारताच्या वैभवाचं चित्र डोळ्यासमोर आणलं.

विष्णुगुप्त या व्यापाऱ्यांबरोबर जात असताना आपल्या आयुर्वेदाच्या ज्ञानाचा त्यांना फायदा करून देत असे. या व्यापाऱ्यांपैकी कोणी आजारी पडला तर त्याच्यावर औषधोपचार करीत असे. त्याने अचूक निदान करून दिलेल्या औषधाचा फायदा व्यापाऱ्यांना होत असे. मग ते त्याच्या मोबदल्यात रत्ने, हिरे बक्षीस म्हणून विष्णुगुप्ताला देऊ करीत. पण तो त्याचा स्वीकार करीत नसे. फक्त आपल्या निर्वाहापुरतेच स्वीकारून बाकीचे नाकारीत असे. त्याच्या या निरिच्छ, अपरिग्रही स्वभावाने व्यापारी त्याला अधिकच मानू लागले. रस्त्यांत त्यांना अनेक लोक भेटले. त्यांच्याशीही ते बोलले.

अशा तऱ्हेने विष्णुगुप्त पाटलीपुत्रास पोहोचला आणि त्याला मगधाच्या वैभवाचं दर्शन घडलं. हे राज्य समृद्ध होतं, संपन्न होतं; पण त्यामुळे राजासह सारी प्रजा आळशी बनली होती. तिथं राज्य करणारा धनानंद राजा द्यूत, मदिरा आणि मदिराक्षी यांच्यातच सदैव गुंतून पडलेला असे. राज्य चालविण्याकडे त्याचं दुर्लक्ष झालं होतं. सर्व प्रशासन खिळखिळे झाले होते.

पाटलीपुत्रात येताना त्याने धनानंदाच्या संपत्तीचा व शक्तीचा अंदाज घेण्याचाच विचार केला होता. धनानंदाविषयी त्याला समजले की, तो उन्मत्त, जुलमी व अत्याचारी बनला आहे. प्रजा असंतुष्ट आहे.

☆ ☆ ☆

## १० धनानंदाच्या दरबारात प्रथम

विष्णुगुप्तांना धनानंदाला भेटण्याची इच्छा होती. पण खरेतर विष्णुगुप्ताची कीर्ती ऐकून आपल्या प्रशासनात विष्णुगुप्त हा असलाच पाहिजे, असा आग्रह धनानंदाचा अमात्य राक्षस यानेच धरला होता व म्हणून धनानंदाने विष्णुगुप्ताकडे बोलावणे पाठविले होते. रस्त्यातच धनानंदाच्या दूताशी विष्णुगुप्ताची भेट झाली व त्याला निमंत्रण मिळाले.

पाटलीपुत्रात प्रवेश केल्यानंतर तिथल्या देखण्या भव्य इमारती त्यानं पाहिल्या. राजा व त्याच्या सेवकांनी जनतेचे शोषण करून त्या उभ्या केल्या होत्या. त्यामुळे त्या पाहून कौतुक वाटण्याऐवजी त्याच्या मनात चीडच उत्पन्न झाली.

राजवाड्याच्या प्रवेशद्वारापासून आत दरबारापर्यंत सैनिकांचा सक्त पहारा होता. आत प्रवेश घेऊ इच्छिणारांकडून हे पहारेकरी लाच स्वीकारीत व आत प्रवेश देत असत. पण या पहारेकऱ्यांना धुडकावून लावून विष्णुगुप्ताने दरबारात प्रवेश केला. त्यावेळी तारवटलेल्या लाल डोळ्यांचा धनानंद, नशेत चूर होऊन बसला होता.

विष्णुगुप्तांनी दरबारात प्रवेश करताच सारे दरबारी आदराने उभे राहिले. त्यांच्या कानावर विष्णुगुप्ताची कीर्ती अगोदरपासूनच पोहोचलेली होती. अमात्य राक्षस पुढे झाला. त्याने विष्णुगुप्ताचे स्वागत करून त्याला आसन दिले. नम्रभावाने पूजन केले. त्या सर्व स्वागताचा स्वीकार करू नये, असे मनातून वाटत असतानाही विष्णुगुप्तांनी न बोलता त्याचा स्वीकार केला. कारण त्यांनी मनातून विचार केला की, आपला देश सध्या अडचणीत आहे. आज ना उद्या आपण या राज्यात लक्ष घालू आणि ते व्यवस्थित चालविण्याचा प्रयत्न करू.

मग विष्णुगुप्तांनी आपल्याला बोलावण्याचे कारण विचारले तेव्हा अमात्य राक्षसानेच पुढे होऊन सांगितले की, "आम्ही आपल्याला आमच्या राज्याचे दानाध्यक्ष व न्यायाध्यक्ष म्हणून नेमू इच्छितो; तरी आपण या पदांचा स्वीकार करावा."

ही दोन महत्त्वाची पदे आपणास दिल्याचे त्यांना आश्चर्य वाटले. पण त्यांनी या पदांचा स्वीकार केला. कारण हे राज्य न्यायी व लोक-कल्याणकारी करण्याचा त्यांचा विचार होता.

☆ ☆ ☆

## ११ विष्णुगुप्ताचे आर्य चाणक्य झाले !

पाटलीपुत्र येथील विद्वान पंडितांच्या सभेकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत पास होऊन आचार्य पदवी स्वीकारण्याविषयी अंभी राजानं सांगितलं होतं. म्हणूनच विष्णुगुप्त तक्षशिलेहून पाटलीपुत्राला आले होते.

ज्या दिवशी विष्णुगुप्तांनी पाटलीपुत्रात पाऊल टाकलं नेमकी त्याच दिवशी विद्वत्त सभा भरली होती. आचार्यपदाची परीक्षा घेण्यासाठी अशी सभा वर्षात एकदाच भरत असे, आणि सूर्यास्तानंतर त्या समितीचे



विद्वानांच्या प्रश्नास उत्तम उत्तरे देऊन चाणक्याने सर्वांना चकित करून सोडले.

म. ग्रं.
ना. क्र. २०४३ 3/13/07

कामकाज बंद होत असे. तो दिवस चुकला की वर्षभर थांबावे लागे.

सायंकाळ होत आली हाती. दरबारच्या सभागृहाबाहेर पाच-सहा पंडित थांबले होते. त्यांना वेळ संपल्यामुळे आत प्रवेश मिळत नव्हता. तेवढ्यात विष्णुगुप्त तेथे पोहोचले. पहारेकऱ्यांना न जुमानता आत प्रवेश केला. आपल्या वाक्चातुर्याने विद्वत्त सभेला परीक्षा घेणं भाग पाडलं. बाहेर तिष्ठणाऱ्या पंडितांसह सर्वांची एकदम परीक्षा घेण्यात आली.

प्रत्येक विद्वानाने एक-एक करून केलेल्या प्रश्नांच्या भडिमारास विष्णुगुप्तांनी अत्यंत चतुराईने, बुद्धिमत्तेने उत्तम उत्तरे देऊन सर्वांनाच चकित केले. सर्वांनी आदराने उभे राहून विष्णुगुप्तांना आचार्य पदवी परीक्षेत उत्तीर्ण असल्याचं प्रमाणपत्र दिलं.

धनानंद राजाचा अमात्य राक्षस यानेही त्यांचं अभिनंदन केलं व राजाच्या सेवेत येण्याचं निमंत्रण दिलं. या यशानंतर आपल्या चणक गावी जाऊन माता-पित्यांना भेटण्याचा मनोदय विष्णुगुप्ताने व्यक्त करताच नद्यांच्या महापुरात चणक वाहून गेलं असून कोणी जगले असण्याची शक्यता नाही, अशी माहिती अमात्य राक्षसाने खेदाने दिली.

सोळा वर्षे शिक्षणात गेली. दोन वर्षे अध्यापनात गेली. या काळात मातापित्यांची भेट झाली नव्हतीच; त्यामुळे विष्णुगुप्तांना दुःख झाले. विष्णुगुप्तांनी त्यांची परीक्षा घ्यायला लावल्याबद्दल अमात्यांचे आभार मानले. मग त्यांनी अमात्यांना विनंती केली "आता विष्णुगुप्ताचं काहीच राहिलं नाही. तेव्हा मी चणक गावचा. म्हणून आपण मला यापुढं चाणक्य म्हणूनच संबोधावे. कारण माझ्या चणक गावाचा संबंध सुटू नये. ते जरी आज महापुराने उद्ध्वस्त झाले असले तरी ते माझ्या मनातून जाऊ नये."

अमात्य राक्षसांनी त्यांची ही विनंती मान्य केली आणि विष्णुगुप्तांनी स्वतःच धारण केलेल्या नावाने आचार्य चाणक्य म्हणून संबोधले.

मग पुन्हा त्याने अमात्यांना विनंती केली, "मला आता आचार्य शब्दाचं अप्रुप राहिलेलं नाही. म्हणून इथंसुद्धा मला तक्षशिलेत संबोधले जात होतं तसं 'आर्य' नावानेच संबोधावे. कारण मला आर्य संस्कृतीचा नक्कीच अभिमान आहे. तसेच येथे होऊन गेलेल्या पूर्वसूरींच्या, आचार्यांच्या हातून जसं भरीव कार्य झालं तसंच माझ्या हातून घडावं. केवळ परवा झालेल्या परीक्षेत पास झालो म्हणून आचार्य पदवीने आपण सन्मानीत व्हावं असं मला वाटत नाही."

मग अमात्य म्हणाले, "जशी आपली इच्छा आर्य चाणक्य!"

अशा तऱ्हेने पाटलीपुत्राच्या विद्वत्त सभेत आचार्यपदाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यापासूनच विष्णुगुप्तांनी आपलं हे जुनं प्रचलित नाव सोडून दिलं आणि आता ते आर्य चाणक्य म्हणूनच वावरू लागले. सर्वजण त्यांना आता याच नावाने संबोधू लागले. मग इतिहासानेसुद्धा याच नावाची नोंद आपल्या सोनेरी पानावर करून ठेवली.

☆ ☆ ☆

# १२ पाटलीपुत्रात दरारा !

विष्णुगुप्त - चाणक्य - यांनी धनानंदाच्या दरबारात दानाध्यक्ष व न्यायाध्यक्षाचे पद स्वीकारले. या नगरीत पाऊल टाकताच इथली बेशिस्त, गरीबांवरील जुलूम, जबरदस्ती, अन्याय त्यांच्या नजरेत भरले होते. अधिकाऱ्यांच्या लाचखोरीची माहितीही मिळाली होती. म्हणूनच या पदाची सूत्रे हातात घेताच या सर्व गोष्टी थांबविण्याचा त्यांनी निर्धार केला. गाफिल, निष्काळजी अधिकाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा निश्चय केला.

यासाठी ते स्वतःच्या कचेरीत बसून कार्य करीत नसत, तर संपूर्ण शहरात, राज्यांत फिरून अचानक पाहणी करीत असत. कामावर नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या कामाची, हिशोबाची, नोंदींची पाहणी जागेवर अचानक जाऊन करीत. यासाठी रात्री, अपरात्रीसुद्धा ते फेरफटका मारीत असत. हे करताना कोठे कोणी कुटिल कारस्थाने करीत असेल तर तेसुद्धा त्याच्या लक्षात येई. अनेक वेळा चाणक्य वेषांतर करून ही माहिती मिळवीत असत.

ही सर्व माहिती मिळाल्यानंतर या राज्याला मोठी कीड लागली असून ते मोडकळीस, डबघाईस आले असल्याचे त्यांच्या लक्षात आले. आपण जर आता येथे आलो नसतो तर या संपूर्ण राज्याचा सर्वनाश झाला असता हे त्यांनी ओळखले. येथे योग्य वेळी आल्याने होणार असलेला विनाश टाळता येईल या गोष्टीचे समाधान त्यांना लाभले.



आर्य चाणक्य राज्यांत फिरून पाहणी करीत असे.

राजा व्यसनी, अधिकारी बेबंद मग प्रजा अनिर्बंध वागली नाही तरच नवल. राजाच्या आज्ञा राजधानीतच काय पण राजवाड्यामध्येसुद्धा कोणी मानेनासा झाला होता. म्हणून चाणक्यांनी आपल्या अधिकाराचा कठोरपणे उपयोग करायला सुरुवात केली. जनतेची मर्जी चाणक्यांवर बसली. ते इतर अधिकाऱ्यांहून वेगळे आहेत, हे जनतेने ताबडतोब ओळखले.

असेच एक दिवस रात्रीची वेळ होती. चाणक्य नगरीत फेरफटका मारायला बाहेर पडले. त्यांचे पाय शस्त्रागाराकडे वळले. तिथला रक्षक झोपला होता. त्याला उठविले. तिथल्या नोंदी पाहिल्या, कागदपत्र तपासले. तिथली शस्त्रास्त्रे कमी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. तिथल्या रखवालदारास चाणक्यांनी फाशीची शिक्षा सुनावली.

असेच एक दिवस रात्रीच्या वेळी चाणक्य शहरात फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडले होते. ते फिरण्यासाठी जरी बाहेर पडले तरी त्यांची चाल सावध होती. नजर शोध घेणारी होती. कान वेध घेणारे होते. जाता जाता रस्त्याकडे लागत असलेल्या घरातून त्यांना कुजबूज ऐकू आली. इतक्या रात्री कुजबूज म्हणजे काही विशेष असणार असा अंदाज बांधून ते तेथेच थांबले.

कान देऊन ऐकल्यानंतर त्यांना कळाले की, बाहेरच्या राज्याचा एक गुप्तहेर तिथं आला होता. पाटलीपुत्राच्या एका अधिकाऱ्यास सोन्याच्या मुद्रांची लालच दाखवून विकत घेऊ इच्छित होता. सुवर्णमुद्रांच्या बदल्यात इथली गुप्त खलबतं, गुप्त योजना, गुप्त बातम्या त्याला पोहोचवावीत असं तो म्हणत होता.

ही कुजबूज ऐकून चाणक्य अस्वस्थ झाले. दुसऱ्या दिवशी सकाळीच त्या अधिकाऱ्यास बोलावून घेऊन तसे करण्यास त्यांनी सांगितले आणि मग एके दिवशी त्याला पकडून फाशी देण्याचे जाहीर केले. अर्थात त्या अधिकाऱ्याने खरी माहिती अगोदरच दिली असल्याने प्रत्यक्ष त्यास फाशी न देता अन्यत्र लपवून सुरक्षित ठेवण्याचे ठरविले.

या आणि अशा अनेक योजनांमुळे त्यांनी पाटलीपुत्रात आपला एक वेगळा ठसा उमटविला आणि स्वतःचा असा एक दरारा निर्माण केला. जनतेलासुद्धा हा अधिकारी इतर सर्व सामंत, मंत्री, अधिकारी यांच्यापेक्षा फारच वेगळा भासला होता.

त्यांच्या या योजना यशस्वी करण्यासाठी त्यांना एक धाडशी, प्रामाणिक, कर्तबगार असा तरुण मदतनीस हाताशी हवा होता. या कार्यात त्यांना जनतेचे सहाय्य हवे होते. हे सर्व घडवून आणण्यासाठी ते अतोनात प्रयत्न करणार होते. त्यांना पाटलीपुत्रात मिळालेलं दानाध्यक्ष आणि न्यायाध्यक्षाचं पद या कामी उपयोगी ठरणार होतं. त्यांनी मिळविलेलं ज्ञान, त्यांची बुद्धिमत्ता, त्यांना प्राप्त झालेले अधिकार यांचा उपयोग ते जनतेच्या कल्याणासाठी करणार होते.

☆ ☆ ☆

## १३ धनानंदाकडून अपमान



'नंदकुळाचा नाश करीन तेव्हाच शेंडीला गाठ मारीन.' आर्य चाणक्याने प्रतिज्ञा केली.

विद्वत्त सभेची वेळ संपली असताना, राजाच्या परवानगीशिवाय दरबारात घुसून चाणक्यांनी विद्वानांना आपली परीक्षा घेणे भाग पाडले होते. धनानंदाच्या मनात नसतानाही हे घडले होते. राजाला हा उद्धटपणा आवडला नव्हता. त्यामुळे राजा धनानंद चाणक्यांवर फारसा खूष नव्हताच.

त्यात चाणक्यांनी दानाध्यक्ष व न्यायाध्यक्ष पदाची सूत्रं हातात घेतली होती. त्यांनी राज्यातील अंदाधुंदी पाहिली, जनतेवरील अत्याचार, जुलूम पाहिले, त्यांचे शोषण, पिळवणूक पाहिली. जनतेचे दारिद्र्य आणि लहरी राजाच्या अधिकाऱ्यांची श्रीमंती पाहिली. त्यांचे मन जनतेबाबत कळवळले, तर अनागोंदीच्या क्षोभाने भडकून उठले. भरपूर धान्य पिकविणारे शेतकरी उपाशी रहावेत हे त्यांना पटणारे नव्हते. ते न्यायाध्यक्ष होते. मग जनतेला न्याय नको का?

त्यांनी अधिकाऱ्यांना काटकसरीच्या सूचना दिल्या. न्यायव्यवस्थेत बदल घडवून आणले. या कामात सुसूत्रता आणली. काही नवीन कायदे केले. त्यामुळे अकार्यक्षम अधिकारी चरफडू लागले. चाणक्यांनी कामचुकार अधिकाऱ्यांना फटकारलं तर असंतुष्ट प्रजेला चुचकारलं. जनतेला चाणक्य आवडू लागले.

राजा धनानंद क्रूर, लोभी स्वभावाचा होता. दुष्टपणाबरोबरच व्यसनी आणि हलक्या कानांचा होता. असंतुष्ट, चुकार, अकार्यक्षम

अधिकाऱ्यांनी राजा धनानंदाचे चाणक्याविरुद्ध कान भरले. धनानंदाची पहिल्यापासून खप्पामर्जी होतीच. आता आणखी या अधिकाऱ्यांच्या तक्रारी ऐकून खूप चिडला. एक दिवस चाणक्य दरबारात येताच धुंदी चढलेला धनानंद एकदम ओरडला, "तिथेच थांब. आणि आजच्या आज इथून चालता हो."

भर दरबारातील या अपमानाने स्वाभिमानी, महत्त्वाकांक्षी चाणक्यांच्या मनावर फार मोठा घाव बसला. त्यांना खूप संताप आला. आपल्या शेंडीचे केस मोकळे सोडून त्यांनी राजाला सांगितले,

"राजा, मी जातो; पण ध्यानात ठेव, आता संपूर्ण नंदकुळाचा नाश केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, आणि तोपर्यंत मी माझ्या शेंडीची गाठही मारणार नाही. या जुलमी राजवटीतून पाटलीपुत्र नव्हे तर मगध राज्याला मुक्त केल्याशिवाय राहणार नाही."

ही प्रतिज्ञा ऐकताच धनानंदाची नशा पार उतरली. तो मनात घाबरला.

☆ ☆ ☆

## १४ चंद्रगुप्ताचा शोध

चंद्रगुप्त हा प्रारंभी गुराखी होता असं सांगितलं जातं. चाणक्य रस्त्याने जाताना एका शेतात गुराखी मुले खेळताना पाहिली. त्या खेळातही चंद्रगुप्ताचं आगळेवेगळेपण चाणक्यांच्या डोळ्यात भरलं. त्याचे गुण त्यांनी हेरले. त्याला शिक्षणासाठी आपल्या बरोबर घेतलं. त्याला सर्व प्रकारचं शिक्षण दिलं. युद्धकला शिकविली. त्याला आपला शिष्योत्तम बनविला.

या चंद्रगुप्ताचा वंश मौर्य सांगितला जातो. या नावाबाबत अनेक मतप्रवाह आहेत. काहींच्या मते, धनानंद राजाच्या मुरा नावाच्या दासीचा मुलगा म्हणून त्याला मौर्य म्हणतात. पण काही विद्वानांना हे मत मान्य नाही.

जैन धर्माच्या साहित्यातून चंद्रगुप्ताला काश्यप गोत्र कुलोत्पन्न मानले असून तो एका खेडेगावातील कुटुंबात जन्मला होता. त्या गावात खूप लोक मोर पाळत असत. त्यावरून मौर्य नाव पडले असावे, असे मानतात; तर बौद्ध विद्वानांच्या मते, तो क्षत्रिय असून नेपाळच्या पायथ्याशी तरवई प्रदेशात मौर्य लोक रहात होते. तेथे त्यांचे गणराज्य होते. त्यांच्यापैकीच चंद्रगुप्त असावा, असे मानण्यात येते; तसेच या प्रदेशात मोर पक्ष्यांचे वास्तव्य फार मोठ्या संख्येने होते म्हणूनही मौर्य म्हणत असावेत, असे म्हणतात.

सामान्यतः इतिहासकारांनी चंद्रगुप्त हा मौर्य किंवा मोरिया वंशाचा असावा, असे मान्य केले आहे. चंद्रगुप्ताचे राज्य सध्याच्या उत्तर प्रदेशातील गोरखपूरच्या आसपास असावे. ते गणतंत्र असावे असे मानतात.

चंद्रगुप्ताची आई पाटलीपुत्र नगरात रहात असतानाच तिच्या पोटी चंद्रगुप्ताचा

जन्म झाला. चंद्रगुप्त मोठा झाला तेव्हा नंदाच्या सेनेत दाखल झाला. स्वतःच्या पराक्रमाने तो मोठ्या अधिकारपदापर्यंत पोहोचला. पण त्याचे धनानंदाशी पटले नाही. त्यामुळे त्याने धनानंदाची नोकरी सोडली.

मग त्या राज्यातील असंतुष्ट लोकांना हाताशी घेऊन बंडाचाही प्रयत्न केला. पण तो अयशस्वी झाला. मग चाणक्यांच्या सांगण्यावरून ग्रीक सेनेची, त्यांच्या युद्ध-कौशल्याची, लढाईच्या तंत्राची माहिती घेण्यासाठी तो ॲलेक्झांडरच्या सेनेतही गेला. पण अलेक्झांडरशी न पटल्याने तो त्याच्या सेनेतून बाहेर पडला.

पण लहानपणी तो गुराख्यांत कसा गेला असा प्रश्न पडतो. त्यासंबंधात असे म्हटले जाते की, चंद्रगुप्ताच्या मामाने चंद्रगुप्ताच्या सुरक्षिततेसाठी त्याला एका गुराख्याकडे दिले. त्या गुराख्याने त्याला शिकाऱ्यास विकले व शिकाऱ्याने त्याला शेतकऱ्याकडे दिले. त्या शेतकऱ्याने त्याला आपली गुरे राखण्याचे काम दिले.

गुरे सांभाळता सांभाळता तो जे खेळ खेळत असे त्यातूनच त्याचे वेगळेपण दिसून येत असे. तो लहान सवंगड्यांचा लुटूपुटीचा दरबार भरवी व स्वतः राजा होत असे. न्यायालय भरवी व स्वतः न्यायाधीश होत असे. असे खेळ पाहत असतानाच चाणक्यांनी त्याला हेरले आणि आपल्याबरोबर तक्षशिलेस नेऊन स्वतः जातीने त्याला शिक्षण देऊन त्याची उत्तम प्रकारे तयारी करून घेतली.

धनानंदाच्या अन्याय, अत्याचार, जुलमाला कंटाळून त्याच्या लहरीपणा व उद्दामपणाच्या संतापाने चंद्रगुप्ताने सैन्याला हाताशी धरून लष्करी क्रांती करण्याचा - बंड करण्याचा - प्रयत्न केला. त्यात तो असफल झाला व धनानंदाची नोकरी सोडून तो हिमालयाच्या तराई भागात भटकत असताना त्याची आर्य चाणक्यांशी भेट झाली. यापुढील त्याचे आयुष्य सुवर्ण घटनांनी उजळून निघाले. भारताच्या इतिहासात देदीप्यमान चंद्राप्रमाणे त्याचा पराक्रम तेजाळून निघाला. इतिहासाच्या पानापानांवर त्याच्या असामान्य अशा कर्तृत्वाचे ठसे जागोजागी उठले आणि कदाचित त्याच्यामुळेच कौटिल्यांच्या म्हणजे चाणक्यांच्या 'अर्थशास्त्र' या अमूल्य अशा ग्रंथांची देणगी जगाला मिळाली, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

विद्वान आणि मुत्सद्दी चाणक्य आणि पराक्रमी चंद्रगुप्त एकत्र आले. धनानंदाच्या राज्यातील प्रजेच्या असंतोषाचा फायदा घेण्याचे त्यांनी ठरविले. चाणक्यांनी अगोदरच प्रशासनात आपली माणसे नेमलेली होती. सर्वत्र हेरांचे जाळे पसरून राज्य यंत्रणा खिळखिळी करून टाकली होती. त्यांनी थोडे सैन्य जमवून पाटलीपुत्रावर हल्ला केला, पण धनानंदाच्या सेनेपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. धनानंदाने त्यांना देशद्रोही ठरविले, राजद्रोही ठरविले. मग ते वेषांतर करून भटकत राहिले.

## १५ चंद्रगुप्तासारखे करू नको !

वेषांतर करून चंद्रगुप्त भटकत होता. अपयशाची कारणे शोधून त्यावर विचार करून उपाय शोधत होता. भटकत भटकत तो एका खेडेगावात गेला. एका गरीब शेतकऱ्याच्या झोपडीत त्याने मुक्काम केला. वेषांतरामुळे त्याला कोणीच ओळखत नव्हते. झोपडीत एक वृद्धा आणि तिचा अगदी तरुण मुलगा असे दोघेच रहात होते.

जेवणाची वेळ होती. वृद्धेचा मुलगा जेवायला बसला होता. वृद्धेने नुकतीच केलेली गरम गरम भाकरी त्या मुलाला वाढली. भाकरीचा पापड टम्म फुगलेला होता. गरम भाकरी खाण्यासाठी म्हणून त्या मुलाने भाकरीचा मधलाच एक तुकडा तोडण्याचा प्रयत्न केला. तशी पापडाखाली दबलेली सगळी वाफ हातावर आली. हाताला चटका बसताच तो हात झटकू लागला.

हे पाहून ती वृद्धा मुलास म्हणाली, ''अरे बाळा, चंद्रगुप्तासारखे करू नये. भाकरी प्रथम कडेकडेने खावी.'' त्या वृद्धेचे बोलणे स्वतः चंद्रगुप्तच ऐकतो आहे हे त्या वृद्धेला माहीतच नव्हते. पण ते बोलणे ऐकून चंद्रगुप्त चपापला. तो मनात विचार करीतच तिथून बाहेर पडला.

त्याने गुप्तवेषात भटकणाऱ्या आपल्या गुरूंचा - चाणक्यांचा ठावठिकाणा मिळवून त्यांची भेट घेतली आणि झोपडीतला तो प्रसंग त्यांना सांगितले व त्या वृद्धेच्या बोलण्यातील गुपित समजावून द्यायला सांगितले.

चाणक्य म्हणाले, ''ती वृद्धा बरोबरच बोलली. तिला युद्धशास्त्रातले जे कळले ते आपल्याला मात्र कळाले नव्हते. आपण राज्याच्या केंद्रस्थानी असलेल्या पाटलीपुत्रालाच एकदम हात घातला. धनानंदाची सारी शक्ती तिथे केंद्रित होती. म्हणूनच आपली बोटं भाजली. अपयश आलं. मगधाच्या कडेने असलेली छोटी छोटी राज्ये जिंकत आपण जर आत मुसंडी मारली असती तर आपल्याला अपयश आलं नसतं. कारण जिंकलेल्या राज्यांच्या सेनेमुळं आपलंही बळ वाढलं असतं आणि कडेकडेचा प्रदेशही जिंकत आल्याने राजधानीची गळसूत्रे बरोबर आवळली गेली असती.

☆ ☆ ☆

## १६ ॲलेक्झांडरच्या सैन्यात चंद्रगुप्त

ग्रीसचा ॲलेक्झांडर जग जिंकण्यासाठी निघाला होता. इराण जिंकून त्याने भारताचा मार्ग धरला. भारताच्या वायव्य भागात छोटी छोटी राज्ये होती. त्यांचे एकमेकांशी वैर होते. एक दुसऱ्याला संपविण्यासाठी टपले होते. तक्षशिलेचा राजा अंभी आणि त्याच्या शेजारचा राजा पौरस यांच्यात असेच भांडण होते.

अंभीनं पौरसाला संपविण्यासाठी ॲलेक्झांडरची मदत मागितली.

तसा अंभी तक्षशिलेत असतानाच चाणक्यांचा विद्यार्थी. पण तेव्हापासूनच घमेंडी, मग्रूर. तो विद्यार्थी म्हणून स्वतःला समजतच नव्हता, तर राजपुत्रासारखाच वागायचा. अंभीने ॲलेक्झांडरची मदत घेतली हे चाणक्यांना कळाले. ते त्यांना आवडले नाही. मायभूमीवरील परकीय आक्रमणाचा शौर्याने प्रतिकार करून परतविण्याऐवजी त्याचं स्वागत करणं त्यांना पटलं नव्हतं.

ताबडतोब चाणक्यांनी चंद्रगुप्ताला बोलावून घेतले आणि ॲलेक्झांडरच्या सैन्यात प्रवेश करण्यास सांगितले. त्याच्या सैन्यात राहून त्यांची वाहने, त्यांची शिस्त, त्यांच्या हालचाली, त्यांचे डावपेच, त्यांची व्यूह रचना या गोष्टींचा अभ्यास करण्यास सांगितले. तसेच त्या सेनेच्या बातम्या वरचेवर त्यांना स्वतःला कळाव्यात असेही सांगितले.

या मधल्या काळात देशातील इतर राज्यांत चाणक्यांनी आपले दूत पाठवून त्यांच्यात जागृती आणण्याचा प्रयत्न केला. स्वदेशभक्ती जागी केली. सगळा देश त्यांना प्रतिसाद देऊ लागला. तक्षशिलेत राहून ॲलेक्झांडर छोट्या छोट्या राजांना शरण येण्यास सांगू लागला. आसपासचे अनेक राजे त्याला शरण गेले. पण पौरसाने शरणागतीस नकार दिला. मग ॲलेक्झांडरने त्याच्यावर आक्रमण करून त्याला जिंकून घेतले. पण मग त्याचे शौर्य, स्वाभिमान पाहून त्याला राजासारखीच वागणूक मिळावी म्हणून त्याला परत सोडून दिले. हा सर्व वृत्तांत पाहून चंद्रगुप्ताने गुप्तपणे येऊन चाणक्यांना सांगितला.

ॲलेक्झांडरच्या सेनेत राहून चंद्रगुप्त त्यांची ग्रीक भाषा शिकला. त्यांचा देव, देवाबद्दलचे समज, कुळाचार जाणून घेतला. राजा सर्वांत पुढे राहून कसा मार्गदर्शन करतो ते पाहिले. मग त्याच्या लक्षात आले की भारतातील छोट्या छोट्या राज्यात एकी नाही, प्रभावी नेतृत्व नाही. सुसज्ज सैन्य नाही. नवनवीन डावपेच लढविले जात नाहीत. प्रामुख्याने राजा आणि सैन्य यांच्यात स्वदेशाभिमान अजिबात नाही.

☆ ☆ ☆

## १७ एकच ध्येय

चंद्रगुप्ताने हे सर्व चाणक्यांना सांगितले तेव्हा चाणक्य त्याला म्हणाले, "आपल्या दारात परकीय आक्रमण आले असता जो राजा स्वस्थ बसतो, जो राजा प्रजेवर जुलूम करतो, प्रजेची पिळवणूक करतो, जो राजा व्यसनात कायम धुंद राहून कर्तव्य विसरतो, अशा मगधाच्या धनानंदाचा पूर्णपणे पाडाव करून एक शक्तिशाली

साम्राज्य निर्माण करण्याची इच्छा तुझ्या मनात निर्माण व्हायला हवी आहे."

ॲलेक्झांडरच्या सैन्यात घेतलेला अनुभव त्याने स्वत: केलेले निरीक्षण याच्याच साह्याने चाणक्यांनी चंद्रगुप्ताला अशा तऱ्हेने चांगला वस्तुपाठ शिकविला. त्याची महत्त्वाकांक्षा जागृत केली. पराक्रमाला साद घातली. देशाभिमानाचे, स्वाभिमानाचे स्फुल्लिंग चेतविले आणि सांगितले, "आता तूच पुढे हो. या देशाचं नेतृत्व तूच कर, ॲलेक्झांडरच्या ताब्यातील भारत तूच मुक्त कर. या कार्याची सुरुवात मगधाच्या स्वातंत्र्याने होऊ दे."

चंद्रगुप्त मंत्रमुग्ध होऊन गुरूंचा उपदेश ऐकत होता. त्यांच्या आज्ञा हृदयापासून कानात झेलत होता. मनामध्ये कठोर निश्चय करीत होता; मग नम्रभावाने खाली वाकून गुरूंच्या चरणांना स्पर्श केला. भावी गुरूंच्या चरणधुळीचा स्पर्श झाल्यावर त्याने स्वाभिमानाने वर पाहिले. आता त्याच्या डोळ्यात एक वेगळंच तेज झळाळत होतं. ते तेज होतं, निश्चयाचं; ते तेज होतं, पराक्रमाचं; ते तेज होतं, सम्राटाचं.

मग चंद्रगुप्ताने भारताच्या वायव्य भागातील राजांचे संघटन केले. लोकांच्या मनात ग्रीकांविषयी मुळीच सहानुभूती नव्हती. या असंतोषाचा फायदा घेतला. याच काळात वेगवेगळ्या कारणांमुळे ग्रीक राजा अलेक्झांडरला स्वारी मध्येच सोडून मायदेशी परत जावे लागले. जाताना त्याने जिंकलेल्या प्रदेशांवर क्षत्रपांची नेमणूक केली होती.

चंद्रगुप्तान त्या भागातील एक क्षत्रप राजा पौरस याच्याशी सख्य जुळविले. ग्रीकांना देशाबाहेर हाकलावे या कामी क्षत्रप, माळव या जमातींचे सहाय्य मिळविण्यात तो यशस्वी झाला. चंद्रगुप्ताने आपले सुसज्ज असे प्रचंड सैन्य उभे केले. या सर्व काळात आर्य चाणक्य गुरू आणि प्रमुख अमात्य म्हणून चंद्रगुप्ताच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले होते. आता चंद्रगुप्ताचे ध्येय एकच होते, ते म्हणजे नंद घराण्यातील धनानंदाचे मगधाचे राज्य जिंकून प्रबळ, एकसंघ, सार्वभौम अशा साम्राज्याची निर्मिती करण्याचे.

☆ ☆ ☆

## १८ आणि शेंडीची गाठ बांधली !

चाणक्यांच्या सल्ल्याप्रमाणे चंद्रगुप्ताने आपले प्रचंड सैन्य उभे केले. मग त्याने आपला मोर्चा पाटलीपुत्राकडे वळविला. प्रथम त्याने मगधाच्या पश्चिम सरहद्दीवर असलेली छोटी छोटी राज्ये जिंकून घेतली. त्या राजांना सेनेसह मांडलिक म्हणून आपल्या सेनेत सामावून घेतले आणि मग मगधात प्रवेश केला.

पाटलीपुत्रावर हल्ला करताना चाणक्यांनी अतिशय धूर्तपणा आणि



चाणक्यांनी चंद्रगुप्ताच्या मदतीने नंदकुळाचा नाश केला !

मुत्सद्दीपणा दाखविला. रात्रीच्या वेळी पाटलीपुत्र शांतपणे झोपले असताना आक्रमणाचा आभास केला. लोक जागे झाले तर चाणक्याचे सैन्य शांत. लोक मस्त झोपले. पुन्हा आक्रमणाचा आभास. लोक पुन्हा उठले, चाणक्याचे सैन्य पुन्हा शांत. असे रात्रभर चालू होते. शेवटी पाटलीपुत्राची सेना गाफिल झाली. पहाटेची साखरझोप घेऊ लागली आणि चंद्रगुप्ताची सेना वेशीतून आत घुसली.

धनानंदाची सेना पुन्हा खडबडून जागी झाली. तिने पूर्ण शक्तीनिशी प्रतिकार केला. चंद्रगुप्ताची पिछेहाट होऊ लागली. डोळ्यासमोर पराभव दिसताच चाणक्यांनी चंद्रगुप्तास माघार घ्यायला सांगितले. चंद्रगुप्त नाराज झाला. तरी त्याला नवी योजना समजावून दिली. चाणक्यांनी आपली माणसं सर्वत्र पेरून ठेवली.

थोड्या वेळानंतर परत आक्रमणाची आज्ञा चाणक्यांनी दिली. पाटलीपुत्रातील असंतुष्ट जनतेचं सहाय्य मिळालं. धनानंदाच्या सैन्याचा गोंधळ उडाला. चंद्रगुप्ताची सरशी होऊ लागली. धनानंदाचा अमात्य राक्षस जीव वाचवून पळून गेला.

चंद्रगुप्ताने मग चाणक्यांसह राजवाड्यात प्रवेश केला. धनानंद हे पाहून पार घाबरून गेला. आपल्या भावांसह तो सिंहासनामागे लपून बसला. चाणक्यांनी अत्यंत कठोर करड्या आवाजात धनानंदाला बाहेर येण्यास फर्मावले. ते आपली प्रतिज्ञा पुरी करण्यास आता सज्ज होते. चंद्रगुप्ताने भेदरलेल्या धनानंदाला खेचून बाहेर काढले. त्याच्या छातीवर बसून तलवारीने त्याचे मुंडके छाटले. त्याच्या सर्व भावांचीही तीच गत केली.

रक्ताच्या थारोळ्यात, सिंहासनासमोर नंद घराण्याच्या सर्व कुलदीपांची कलेवरं पडली होती. त्या नंद घराण्याच्या अंताकडे पहात चाणक्यांच्या चेहऱ्यावर प्रतिज्ञापूर्तीचं समाधान विलसलं. मग त्यांनी हसत हसत आपल्या शेंडीची गाठ मारली.

☆ ☆ ☆

## १९ चंद्रगुप्ताच्या रस्त्यातील काटे उपटून टाकले

धनानंद मेला. नंद वंश बुडाला. चंद्रगुप्त विजयी झाला. चाणक्यांची प्रतिज्ञा पूर्ण झाली. हेतू साध्य झाला. मगधाच्या जनतेने आनंदोत्सव साजरा केला. घराघरांतून, दारादारांतून दीपावलीचं तेज भरलं. पक्वान्नांची रास पडली. प्रजेच्या चेहऱ्यावर मोकळं हसू दिसू लागलं. पण मूठभर लोकांना वाईट वाटलं. त्यांनी जनतेला लुटलं होतं.

अमात्य राक्षस पळाला होता. त्याला जगायचं होतं. त्यानं मनात केला विचार, चंद्रगुप्ताला करूया ठार. पण चाणक्य होते सावध. त्यांची होती सर्वत्र पाळत. अमात्य राक्षसाने केले मनसुबे, पण चाणक्याचे प्रश्नचिन्ह होते उभे.

चंद्रगुप्ताला ठार मारून चाणक्यांना हाकलून द्यायचा डाव राक्षसाने रचला. पण चंद्रगुप्त मात्र चाणक्यांच्या आज्ञेबाहेर नव्हता. अमात्य राक्षस जिवंत होता. तो असे काहीतरी करीलच ही अटकळ चाणक्यांना होती. विजयानंतर राजवाड्यात राहण्याऐवजी गावाबाहेरच राहुटीत राहण्याचा चंद्रगुप्तास त्यांनी सल्ला दिला.

त्यादिवशी रात्री पौरस राजा चंद्रगुप्ताच्या भेटीला राहुटीत येणार होता. मगधाच्या स्वारीत चंद्रगुप्ताला त्याने मदत केली होती व त्याच्या बदल्यात अर्धे नंदराज्य मागून घेतले होते. चाणक्यांनी आपल्या हेरांकरवी पौरसाचे चांगले स्वागत करण्यास चंद्रगुप्ताला सांगितले. त्याच्या मनोरंजनासाठी आर्य चाणक्यांनी चंदनिका नावाच्या विषकन्येची नेमणूक केली.

याअगोदरच साऱ्या पाटलीपुत्रात बातमी पसरली होती. चंदनिकेवर कोणाला तरी

मारण्याची जबाबदारी अमात्य राक्षसाने सोपविली आहे, ही बातमी पसरविण्याचा धूर्तपणाही चाणक्यांचाच. दुसऱ्या दिवशी राजा पौरस आणि चंदनिका या दोघांचीही प्रेतं सैन्याला दिसली होती.

त्याचप्रमाणे मुंग्यांच्या रांगेवरून राज-महालातील गुप्त तळघराचा शोध घेऊन चंद्रगुप्ताला ठार मारण्यासाठी राक्षसाने तेथे लपवून ठेवलेल्या त्याच्या विश्वासू अशा बिभित्सक नावाच्या सेवकाचाही चाणक्यांनी मोठ्या हुशारीने काटा काढला.

पौरस जरी ठार झाला तरी त्याचा भाऊ वैरीचक तेथे आला आणि पाटलीपुत्राच्या गादीवर हक्क सांगू लागला. चंद्रगुप्त राजवाड्यात प्रवेश करण्याची वेळ साधूनच तो आला होता.

अर्थात चंद्रगुप्त राजवाड्यात प्रवेश करतानाच अमात्य राक्षस आपल्या माणसांकरवी काही दगाफटका करणार, याची चाणक्यांना जाणीव होती. त्यांनी चंद्रगुप्ताला सांगून वैरीचक अतिथी असून त्याचे चांगले स्वागत करून प्रवेशाचा पहिला मान द्यावयास सांगितले. दोघांना भरपूर दागिने घालून सजविले. माहूताला पुढच्या हत्तीवर कोण, मागच्या हत्तीवर कोण हे सांगितले नव्हते. पहिला हत्ती पहिल्या कमानीत येताच माहूत उभा राहिला. त्याबरोबर एक प्रचंड तुळई हत्तीवर कोसळली. तिच्या खाली चिरडून वैरीचक ठार झाला.

कमानीचे काम करणाऱ्या दारुवर्मा नावाच्या सुताराला चाणक्यांनी बोलावून विचारले तेव्हा चंद्रगुप्ताला ठार करण्यासाठी अमात्य राक्षसानेच तिथे कळ बसवून तुळई पाडण्याची व्यवस्था करण्यास सांगितल्याचे सांगितले. जनतेला हे कळताच खवळलेल्या जनसागराने त्या सुताराचाच बळी घेतला.

असेच एकदा चंद्रगुप्त आजारी पडला. या संधीचा फायदा घेऊन अमात्य राक्षसाने राजवैद्यांकरवी चंद्रगुप्ताला औषधाच्या निमित्ताने विष देण्याचा प्रयत्न केला. पण तेथे हजर असलेल्या चाणक्यांनी तेच विष राजवैद्यास पाजू[illegible] ते प्रेत अमात्य राक्षसाकडे पाठविण्याची व्यवस्था केली.

अतिशय हुशार, धूर्त, पराक्रमी अमात्य राक्षसाचे सहाय्य चंद्रगुप्ताला मिळण्यासाठी चाणक्याने राक्षसाचा मित्र चंदनदासला अटक करून राजद्रोहाबद्दल देहान्ताची शिक्षा सुनावली व याच मधल्या काळात चंद्रगुप्ताशी जोरदार भांडण झाल्याचे बेमालूम नाटक करून ती बातमी सर्वत्र पसरविली. मित्र चंदनदासचा जीव वाचविण्यासाठी अमात्य राक्षस तेथे येताच त्याच्याकडून चंद्रगुप्ताला सहाय्य करण्याचे व त्याचा अमात्य होण्याचे वचन मिळविले.

मलयकेतू राजाला चंद्रगुप्तावरील आक्रमणास मदत करण्यास येणाऱ्या पाच राजांचा परस्पर निकाल लावला आणि कमकुवत झालेल्या मलयकेतू राजाला आक्रमणासाठी हेरांकरवी उत्तेजित करून त्यालाही शरण आणला.

☆ ☆ ☆

# २० कौटिल्याचे अर्थशास्त्र

चंद्रगुप्ताचा साम्राज्यविस्तार झाला. त्याची उत्तम व्यवथा होणे महत्त्वाचे होते. वेगवेगळ्या विभागांवर वेगवेगळे अधिकारी नेमले तरी त्यांची दिशा एकत्र राहणे, त्यांच्यात सुसूत्रता असणे आवश्यक होते. यासाठी चाणक्यांनी 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' हा ग्रंथ लिहिला.

या ग्रंथात राजकीय व आर्थिक व्यवहारासंबंधी अतिशय चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन केलेले आहे. हा ग्रंथ त्यावेळच्या राजकीय परिस्थितीनुसार लिहिला गेला आहे. त्यामुळेच या ग्रंथात सामाजिक परिस्थिती, राजाचे मंत्री, हेरखाते, दंडनीती, राजाच्या उत्पन्नाच्या बाबी, युद्ध, राजाची कर्तव्ये इ. विविध विषयांसंबंधी मार्मिकतेने स्पष्टीकरणे दिली आहेत.

या ग्रंथाचे १५ मोठे भाग आहेत. त्यांना 'अधिकरण' असे म्हणतात. या अधिकरणाचे आणखी १८० उपविभाग केले असून त्या प्रत्येकास 'प्रकरण' म्हटलेले आहे.

कौटिल्यांनी आपल्या या ग्रंथात अनेक बाबींची चर्चा आणि विवेचन केलेले आहे. राजाने मंत्री नेमताना त्यांची योग्यता पाहून, पारखूनच घ्यावी व नंतर निवड करावी. प्रत्येक विभागातील अधिकाऱ्यांची नेमणूक काटेकोरपणे करावी व त्या प्रत्येकावर बारीक लक्ष ठेवलेले असावे.

साम्राज्याचे मूळ गमक म्हणजे त्याचे असलेले सैन्य. त्यामुळे आपले सैन्य सामर्थ्यवान करण्याकडे राजाने विशेष लक्ष पुरविणे अतिशय आवश्यक आहे. जनतेच्या विकासासाठी, प्रजेच्या प्रगतीसाठी राजाने विविध उपाय योजणे आवश्यक आहे.

राजाने आपली प्रजा, तिचा धर्म याच-बरोबर पवित्र धार्मिक स्थळांची काळजी घ्यावी. राजाने आपली कर्तव्ये टाळण्याचा कधीही प्रयत्न करू नये. या सर्व बाबींच्या मार्गदर्शनाबरोबरच या ग्रंथात चाणक्यांनी कर-आकारणी, अनेक शासनोपयोगी कायदे, न्यायदानाचे स्वरूप, युद्धतंत्र, परराष्ट्रनीती, सार्वजनिक आरोग्य, सैन्य रचना, नगर रचना या गोष्टींसंबंधीही मार्गदर्शन केलेले आहे. या ग्रंथाला शासनाचा 'विश्वकोष' असे म्हणतात.

यात कौटिल्य - आर्य चाणक्य म्हणतात, "प्रजेचे सुख हेच राजाचे सुख, प्रजेच्या भलाईत राजाची भलाई आहे. राजाचे कल्याण प्रजेच्या सुखात आहे."

☆ ☆ ☆

## २१ चाणक्यांचा निःस्वार्थीपणा

चाणक्यांनी अगदी लहान वयापासून चंद्रगुप्ताचे गुण हेरून त्याला घडविले. त्याच्या गुरुपदाबरोबरच त्याचे अमात्यपद सांभाळले. आपल्या हुशारीने, धूर्तपणाने, मुत्सद्दीपणाने व उत्कृष्ट कुटिल नीतीचा वापर करून चंद्रगुप्ताला यश संपादन करून दिले. चंद्रगुप्ताचा साम्राज्यविस्तार भारताच्या वायव्य भागात अफगाणिस्तान, सिंधू नदी, हिंदुकुश पर्वतापर्यंत नेला. ग्रीक व अन्य परकीय राजांना भारतीय हद्दीतून हाकलून लावले. दक्षिणेकडे सौराष्ट्र, महाराष्ट्र, विदर्भ, आंध्र प्रदेश जिंकून म्हैसूरपर्यंत धडक मारली.

एकछत्री प्रबळ साम्राज्यनिर्मिती व तिचा विस्तार यांबरोबरच चाणक्याने चंद्रगुप्तास उत्तर प्रशासनासही मदत व मार्गदर्शन केले. त्यासाठी 'अर्थशास्त्र' ग्रंथाची निर्मिती करून एक दंडनीती दिली. या दंडनीतीच्या आधारेच चंद्रगुप्ताने उत्तर प्रशासन केले. कर्तव्यदक्ष, विश्वासू, कार्यक्षम व्यक्तींची पारख करून प्रशासनात त्यांची नेमणूक केली.

आपला मित्र चंदनदास याचा जीव वाचविण्यासाठी अमात्य राक्षस नक्की येणार, असा होरा करून सर्व योजना आखल्या व अमात्य राक्षस तेथे येताच चंद्रगुप्ताला मदत करण्याचेच नव्हे तर चंद्रगुप्ताचे अमात्य पद स्वीकारण्याचे वचन घेतले. नंतर ते अमात्य राक्षसाला म्हणाले,

"अमात्य राक्षस, तुम्ही येथे यावे म्हणून तुम्ही केलेली सर्व कारस्थाने आतापर्यंत मी उलटविली. तुमच्यावर, तुमच्या मित्रांवर खोटेनाटे आरोप केले. खरेतर दुर्बळ व्यक्तींनी या भूमीवर राज्य करू नये, असा संकेत आहे. अशा दुर्बळ राजांना मी संपविले. असे सर्व करताना त्यात माझा स्वतःचा कुठलाही व्यक्तिगत स्वार्थ नव्हता. हे अखंड हिंदू राष्ट्र वैभवशाली होण्यासाठी, त्याचा विस्तार होऊन त्याच्या सीमा दूरदूरपर्यंत पसरविण्यासाठी, तसेच भारतातील जे कोणी या राष्ट्राच्या हिताचा विचार करणारे असतील त्यांना एकत्र करण्यासाठी मी हे सर्व प्रयत्न केले. आता मी पुन्हा तक्षशिलेत जाणार आहे. राहिलेले आयुष्य अध्यापनातच घालविणार आहे. तेव्हा आता तुम्ही, चंद्रगुप्त, मलयकेतू असे सर्वजण मिळून सहकार्याने राष्ट्र वाढवा, सांभाळा, अधिक भक्कम करा. उन्मत्त होऊ नका. जनतेच्या कल्याणामध्येच राजाचे सुख असते हे ओळखूनच आपले वागणे, व्यवहार ठेवा. मला आता सर्वांनी निरोप द्या."

अशा तऱ्हेने कुठल्याही पदाचा मोह न धरता हा दूरदर्शी, विद्वान, निःस्पृह आचार्य परत अध्यापनासाठी तक्षशिलेस गेला.

☆ ☆ ☆

# २२ उपसंहार

भारत देशाचा इतिहास आपण पाहिला तर त्रिकालाबाधित ज्यांचे महत्त्व राहील असे अनेक युगनिर्माते पुरुष होऊन गेले. त्या सर्वांमध्ये आर्य चाणक्य यांचे स्थान अनेक दृष्टींनी असामान्य असेच आहे. आर्य चाणक्य हे स्वतः एक कर्ता क्रांतिकारक होते. ते समर्थ, एकसूत्रीत व वैभवसंपन्न राष्ट्राचे निर्माते होते. भारतीय साम्राज्याचे जनक होते. त्यांनी वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून राज्यशास्त्राचे व राज्यनीतिशास्त्राचे नेतृत्व केले. अभ्यास करून एक नवा मार्ग तयार करून ठेवला.

प्रतिभासंपन्न व द्रष्टा ग्रंथकार म्हणून आर्य चाणक्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा विचार करणाऱ्या प्रत्येक अभ्यासकाचे अंतःकरण स्तिमित झाल्याशिवाय रहात नाही. त्यांनी कौटिल्य बनून अर्थशास्त्र लिहिले तसेच त्यांनी विष्णुगुप्त व वात्सायन नावानेही साहित्यनिर्मिती केली, असे तज्ज्ञ इतिहासकार व जाणकारांचे मत आहे.

पण दुर्दैवाने अशा या राष्ट्रपुरुषाचा इतिहास मात्र केवळ दंतकथा किंवा तत्कालिन साहित्य वा त्यांच्या स्वतःच्या साहित्यिक कृती याद्वारेच लिहावा लागतो. ठोस पुरावे किंवा त्यासंबंधीची ऐतिहासिक साधने मात्र आज उपलब्ध नाहीत. नाट्य-वाङ्मयात मनोरंजनासाठी केलेल्या शाब्दिक धोरणांच्या आधारावर त्यांच्या स्वभाव-वैशिष्ट्यांविषयी अंदाज र इतकेच नव्हे तर आर्य चाणक्य ही व्यक्तीच प्रत्यक्षात न झालेली असून ती एक काल्पनिक व्यक्तिरेखा आहे, असा संशयही व्यक्त करण्यात येतो.

पौराणिक साहित्यात जागोजागी आलेले उल्लेख, विशाखादत्त याने लिहिलेले मुद्राराक्षस नाटक याच्याच आधारे आर्य चाणक्य यांचे बहुमुखी कर्तृत्व आपल्यासमोर उभे राहते. आर्य चाणक्यांच्या व्यक्तित्वाचे तीन पैलू आहेत! नंदकुळाचा नाश करून मौर्यांच्या साम्राज्याची स्थापना केली व संपूर्ण भारत एकछत्री अमलाखाली आणला. त्यांनी भारतीय साम्राज्याची इतकी बळकट बांधणी केली की जगज्जेत्या सिकंदराचा सेनापती सेल्युकस निकोटर याला आपला पराभव कबूल करून आपली मुलगी हेलन ही सम्राट चंद्रगुप्ताच्या चरणी अर्पण करावी लागली. या काळातच भारतीय साम्राज्याची सीमा इराणपर्यंत जाऊन भिडली होती. चंद्रगुप्ताचे राज्य स्थापन करून दृढमूल करणे, त्याचे उत्तम व्यवस्थापन करणे व ते बलशालीच नव्हे तर विजयशाली करून दाखविणे हे आर्य चाणक्य यांच्याच कर्तृत्वाचे फळ होय. ''केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगाला मार्गदर्शक ठरेल अशी राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यनीतीशास्त्रावरील 'कौटिलीय अर्थशास्त्र' ग्रंथाची रचना केली.

☆ ☆ ☆

BVBK-0402943
२९८३ ३१।३।९४